महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

| सेन्सेक्स | ८१,२८७.१९ | -९६१.४२ (१.१७%) |
|---|---|---|
| डॉलर | ₹ ९१.०८ | |

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३४ | १८ |
| दिल्ली | ३१ | १८ |
| मुंबई | ३१ | २० |
| नागपूर | ३३ | २० |
| पुणे | ३३ | ११ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक १०९ किंमत : ५ रु. | पाने ४

### सुविचार

आपले विचार आणि कृती यांच्यातील संगती हेच खरे संतुलन आहे.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:४९ संध्या-६:३२

### सोने - चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,६३,७७०/- २,८५,०००/-

### केळी भाव

नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

## थोडक्यात

### तालिबानच्या हल्ल्यात पाकिस्तानचे ५५ सैनिक ठार

**इस्लामाबाद ।** पाकिस्तान व अफगाणिस्तान यांच्यात पुन्हा एकदा युद्धाचा भडका उडाला आहे. अफगाणी सैनिकांचा पाकिस्तानबरोबरचा संघर्ष हा सहा प्रांतामध्ये चालला. या कारवाईत पाकिस्तानच्या १९ लष्करी चौक्या आणि दोन मोठे तळ उद्ध्वस्त करण्यात आले. यादरम्यान ५५ पाकिस्तानी सैनिकांना ठार करण्यात आले असून काहींचे मृतदेह ताब्यात घेण्यात आले.

### राज्यातील साखर कारखाने अडचणीत!

**पुणे ।** साखरेच्या उत्पादन खर्चापेक्षा विक्रीची किंमत १० टक्क्यांनी कमी आणि त्यातच सरकारकडून इथेनॉलची खरेदीही कमी झाल्याने साखर कारखानदार अडचणीत आले आहेत. कारखानदारांकडून शेतकऱ्यांचे उसाच्या रास्त आणि किफायशीर किमतीचे (एफआरपी) साडेचार हजार कोटी रुपये थकीत असून, कारखाने संकटातून बाहेर काढण्यासाठी केंद्राने साखरेची किंमत वाढविण्याची गरज आहे.

# तिसऱ्या तिमाहीत भारताचा जीडीपी ७.८ टक्के दराने वाढला

## देशाच्या अर्थव्यवस्थेने आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या ऑक्टोबर-डिसेंबर तिमाहीत ७.८ टक्के दराने केली वाटचाल



वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**केंद्र सरकारने आज (२७ फेब्रुवारी) दिलेल्या माहितीनुसार, ऑक्टोबर-डिसेंबर या तिमाहीत भारताची अर्थव्यवस्था मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत ७.८ टक्क्यांनी वाढली आहे. याआधीच्या तिमाहीत हा विकासदर ८.४ टक्के इतका नोंदवण्यात आला होता.**

आर्थिक आकडेवारी अधिक अचूक करण्यासाठी, २०२२-२३ हे आधारभूत वर्ष असलेल्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) नवीन मालिकेमध्ये वस्तू आणि सेवा कर, ई-वाहन आणि स्वयंपाकी, ड्रायव्हर तसेच घरकाम करणाऱ्यांद्वारे पुरवल्या जाणाऱ्या घरगुती सेवांची माहिती समाविष्ट करण्यात आली आहे. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने नवीन मालिकेबाबत प्रसिद्ध केलेल्या 'नेहमी विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यू) नुसार, अर्थव्यवस्थेत गेल्या (पान २ वर)

# शेअर बाजारात 'ब्लॅक फ्रायडे'

● सेन्सेक्स ९६१ अंकांनी कोसळला




वृत्तसंस्था । मुंबई

**भारतीय शेअर बाजारात शुक्रवारी (२७ फेब्रुवारी) मोठी घसरण झाली. मुंबई शेअर बाजाराचा (बीएसई) प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स ९६१.४२ अंकांनी म्हणजेच १.१७ टक्क्यांनी घसरून ८१,२८७.१९ वर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा (एनएसई) निफ्टी निर्देशांकही ३१७.९० अंकांनी म्हणजे १.२५ टक्क्यांनी खाली येत २५,१७८.६५ वर स्थिरावला. या घसरणीमुळे गुंतवणूकदारांचे तब्बल ४.९८ लाख कोटी रुपये एकाच दिवसात बुडाले.**

जागतिक बाजारांतील नकारात्मक संकेत, (पान २ वर)

### भ्रष्टाचारविरोधी 'आप'ला नवसंजीवनी मिळणार?

# केजरीवाल, सिसोदिया यांना मद्य घोटाळ्याप्रकरणी क्लीन चीट

वृत्तसंस्था । नवी दिल्ली



राजधानी दिल्लीत आम आदमी पक्षाचे सरकार असताना उत्पादन शुल्क विभागाच्या मद्य धोरणातून कथित घोटाळा झाल्याचा आरोप होऊन माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना कारावास भोगावा लागला होता. शुक्रवारी दिल्लीतील न्यायालयाने आप नेत्यांची निर्दोष मुक्तता केली. सत्याचा विजय झाला आहे, केजरीवाल, सिसोदिया भ्रष्टाचारी नाहीत, इमानदार आहेत, अशा शब्दात केजरीवाल यांनी निकालाचे स्वागत केले. यावेळी त्यांना अश्रू अनावर झाले

१७ सप्टेंबर २०२४ रोजी भ्रष्टाचार विरोधी मोहिमेचे नेते असलेल्या अरविंद केजरीवाल यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देत धक्कातंत्राचा वापर केला होता. दिल्लीमध्ये विधानसभा निवडणूक काही महिन्यांवर येऊन ठेपली असताना केजरीवाल यांनी ही अग्निपरीक्षा देत असल्याचे म्हटले होते. उत्पादन शुल्क धोरण प्रकरणात कारावासातून बाहेर येताच केजरीवाल यांनी राजीनामा देऊन बाजूला होण्याचा निर्णय घेतला. मात्र भाजपाने ज्याप्रकारे या प्रकरणात आरोपांची राळ उठवली आणि केजरीवाल व त्यांच्या पक्षाच्या (पान २ वर)

# राज्यातील बाजार समित्या म्हणजे शेतकऱ्यांच्या फसवणुकीचे केंद्रे!

● भाजपा आमदार राजेश पवार यांची तक्रार

वृत्तसंस्था । नांदेड

**नांदेडसह राज्यातील बहुतांश बाजार समित्या शेतकऱ्यांसाठी फसवणूक केंद्र बनल्या आहेत. फसवणूक आणि आर्थिक पिळवणूक थांबविण्यासाठी शासनाने कडक उपाय योजावेत. तसेच बाजार समित्यांच्या सर्वच व्यवहारांचे विशेष समिती नेमून लेखापरिक्षण करण्यात यावे, अशी मागणी भाजपाचे आमदार राजेश पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याकडे केली आहे.**



राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनादरम्यान आ.पवार यांनी मुख्यमंत्री फडणवीस तसेच पणन मंत्र्यांची नुकतीच भेट घेतली. अलीकडच्या काळात नांदेड बाजार समितीमध्ये व्यापारी-अडत्यांकडून शेतकऱ्यांची फसवणूक आणि अडवणूक होत असल्याच्या तक्रारी आल्यानंतर जिल्हा उपनिबंधकांनी सर्व संबंधितांची बैठक घेतली होती. या प्रश्नाकडे अन्य आमदारांनी दुर्लक्षच केले; पण पवार यांनी शेतकऱ्यांच्या बाबतीत संवेदनशीलता दाखवत बाजार समित्यांमध्ये 'गोंधळच गोंधळ' असल्याचे सरकारच्या निदर्शनास आणून दिले आहे. अनेक बाजार समित्यांमध्ये निविदा प्रक्रियेत घोटाळे, बेकायदेशीर नेमणुका, अनधिकृत बांधकामे, बेकायदेशीर गाळे विक्री असे गंभीर (पान २ वर)

➢ राज्यातील बाजार समित्यांनी उत्पन्न वाढीसाठी व्यवसाय विकास आराखडा तयार करावा, अशी सूचना पणन संचालकांनी पाच वर्षांपूर्वी दिली होती. त्याची अंमलबजावणी किती बाजार समित्यांनी केली. याची तपासणी करण्याची गरज असून योग्य अंमलबजावणी न करणाऱ्या बाजार समित्यांवर कारवाई केली जावी, असे पवार यांनी सुचविले आहे. आ.पवार यांचे हे निवेदन मुख्यमंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठवून अहवाल सादर करण्याची सूचना दिली, तर या अनुषंगाने संबंधितांची बैठक लावण्याची सूचना मंत्री रावल यांनी आपल्या कार्यालयाला दिली.

# बांगलादेशमध्ये ५.५ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप

● कोलकातामध्ये केंद्रीय मंत्र्यांच्या भाषणावेळी जाणवले धक्के; व्हिडीओ व्हायरल



वृत्तसंस्था । कोलकाता

**बांगलादेशला भूकंपाचा धक्का बसल्यानंतर त्याचे धक्के पश्चिम बंगालची राजधानी कोलकातासह दक्षिण बंगालच्या मोठ्या भागात जाणवले. दुपारी १ वाजून २२ मिनिटांनी बसलेल्या भूकंपाच्या धक्क्यांमुळे लोकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले.**

कोलकात्यापासून पूर्व ईशान्येच्या १०२ किमी अंतरावर ५.५ तीव्रतेच्या भूकंपाचे धक्के बसले. युरोपियन मेडिटेरेनियन (पान २ वर)

**● कोलकाताशिवाय हावडा, हुगळी, झाडग्राम आणि पश्चिम मेदिनीपूर या जिल्ह्यांमध्येही भूकंपाचे धक्के जाणवले. मेदिनीपूर शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयातील लोक भीतीच्या सावटाखाली आले. त्यांनी इमारतीबाहेर पळ काढून मोकळ्या जागेत आसरा घेतला. केंद्रीय मंत्री सुकांता मजुमदार कोलकाता येथे एका कार्यक्रमात भाषण करत असताना भूकंपाचे धक्के जाणवू लागले.**

## राज्यातील मालवाहतूकदार ५ मार्चपासून संपावर

वृत्तसंस्था । मुंबई



इ-चलन प्रणाली विरोधात राज्यातील वाहतूकदारांनी येत्या ५मार्च पासून बेमुदत चक्का जाम आंदोलनाचा इशारा दिला आहे. या आंदोलनात ट्रक, टेम्पो, खाजगी वाहतूक कंपन्या, रिक्षा, टॅक्सी, शालेय बस सहभागी होणार असल्याने राज्यातील माल वाहतूकीसह काही प्रमाणात प्रवासी वाहतूक विस्कळीत होण्याची शक्यता आहे. पोलिस विभाग व परिवहन विभाग इ-चलन देताना योग्य ती अंमलबजावणी करत (पान २ वर)

# महाराष्ट्र लोकसेवा परीक्षेचा निकाल जाहीर

वृत्तसंस्था । मुंबई

**महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा२०२५ चा निकाल जाहीर झाला आहे. मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.**

यंदा कट-ऑफ विक्रमी लागल्याने परीक्षेतील स्पर्धा वाढल्याचे दिसून येत आहे. यावेळी हा निकाल जाहीर करण्यासाठी आयोगाने बराच वेळ घेतला आहे. तब्बल साडे तीन महिन्यांपेक्षा जास्त काळानंतर हा निकाल जाहीर करण्यात आला आहे. ही परीक्षा दिलेले उमेदवार आता पुढील तयारीला लागू शकतात. निकालात पूर्व परीक्षेतील बैठक क्रमांकासह




नावाचा उल्लेख करण्यात आला आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत ९ नोव्हेंबर २०२५ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा२०२५ (राज्य सेवा गट-अ व गट-ब) चा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर शुक्रवारी (२७ फेब्रुवारी) जाहीर करण्यात आला. या पूर्व परीक्षेतून मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकासह नावांची यादी आणि गुणांची सीमारेषा (कट-ऑफ) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

● **प्रवर्गनिहाय कट-ऑफ** - या निकालात प्रवर्गनिहाय कट-ऑफ पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आला आहे. सामान्य प्रवर्गासाठी पुरुषांचा कट-ऑफ ११६ गुण, तर महिलांचा १११ गुण आहे. एससी प्रवर्गात पुरुषांचा कट-ऑफ १०९ गुण आणि महिलांचा १०४ गुण आहे. एसटी प्रवर्गात पुरुषांसाठी ९९ गुण, तर महिलांसाठी ९४ गुण कट-ऑफ निश्चित करण्यात आला आहे. इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गात पुरुषांचा कट-ऑफ ११६ गुण असून महिलांचा १११ गुण आहे. ईडब्ल्यूएस प्रवर्गात पुरुषांचा कट-ऑफ १०३ गुण, तर महिलांचा ९९.५० गुण आहे. तसेच एसईबीसी प्रवर्गात पुरुषांसाठी ११६ गुण आणि महिलांसाठी १११ गुण असा कट-ऑफ जाहीर करण्यात आला आहे.

# विश्व मराठी संमेलनानिमित्त दुमदुमली कुसुमाग्रजांची नगरी

## शोभायात्रेत विद्यार्थ्यांसह हजारो नागरिकांचा सहभाग

वृत्तसंस्था । नाशिक

**मराठी भाषा, साहित्य, संस्कृती, परंपरा, मराठी भाषा -अभिजात मराठीचा जागर करीत आणि ज्ञ्ज्ञानोबा माऊली, तुकारामाफ्च्या गजरात शुक्रवारी सकाळी कविवर्य कुसुमाग्रजांची नगरी अर्थात नाशिक शहर दुमदुमून निघाले होते. त्यात भर पडली होती ती लेझीम, ढोल वादनाची. निमित्त होते, चौथे विश्व मराठी संमेलनाचे. मराठी संमेलन निमित्त निघालेल्या शोभा यात्रेत सहभागी विद्यार्थ्यांची मात्र पायपीट झाली. कुसुमाग्रज निवासस्थान ते संमेलन स्थळ गाठताना सादरीकरण पेक्षा विद्यार्थ्यांना पुढे चला या सूचनेची शेवट पर्यंत अंमलबजावणी करावी लागली. यामुळे विद्यार्थ्यांचा हिरमोड झाला.**






शुक्रवारी सकाळी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या निवासस्थानापासून चौथ्या विश्व मराठी संमेलनानिमित्त शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत विद्यार्थ्यांसह हजारो नागरिक सहभागी झाले होते.महापौर हिमगौरी आडके- आहेर, (पान २ वर)

**● चौथे विश्व मराठी संमेलन मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेच्या केटीएचएम महाविद्यालयाच्या प्रांगणात उभारण्यात आलेल्या कविवर्य कुसुमाग्रज नगरीत होत आहे. या नगरीत १ मार्च २०२६ पर्यंत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सकाळी पालखीसह शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत पारंपरिक लोककला, नृत्य पथक, बोहाडा पथक, लेझीम, ढोल पथकासह वारकरी दिंडी काढण्यात आली.**

## संपादकीय

### वस्त्र निर्यात उद्योगासमोर मोठे आव्हान !

अमेरिकेच्या बदलत्या टॅरिफ (कर) धोरणामुळे भारतीय कापड आणि वस्त्र निर्यात उद्योगासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. भारताच्या एकूण कापड निर्यातीत अमेरिकेचा वाटा २८% इतका मोठा असून, गेल्या वर्षापर्यंत भारतीय मालावर केवळ २% टॅरिफ आकारला जात होता. पण आता १८ टक्के कर भरावा लागेल, असे ट्रम्प यांनी २२ फेब्रुवारी रोजी स्पष्ट केले. हा कर एका मोठ्या आर्थिक भुर्दंडासारखा आहे. सध्या हा मुद्दा अमेरिकन न्यायालयात आहे. एकीकडून नुकसान झाले तर दुसरीकडून एक नवीन संधी आली. मागील महिन्यात अर्थात २७ जानेवारी रोजी झालेल्या भारत–ईयू मुक्त व्यापार करारानुसार, युरोपीय बाजारपेठांमध्ये शून्य शुल्क प्रवेशामुळे निर्यातदारांसाठी व्यवसायाची एक नवीन संधी निर्माण झाली आहे. यापूर्वी युरोपमध्ये भारतीय कापड आणि वस्त्रांवर १२ टक्के कर होता. यावर केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी एक महत्त्वाचे वक्तव्य केले. ११ फेब्रुवारी रोजी गोयल यांनी उद्योग संघटना आणि निर्यात प्रोत्साहन परिषदेच्या प्रतिनिधींची भेट घेतली. या संवादादरम्यान, गोयल यांनी निर्यातदारांना वस्तूंची गुणवत्ता सुधारण्याचे, यंत्रणा आणि पद्धती अपग्रेड करण्याचे, स्पर्धात्मक बनण्याचे आणि नवीन बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्याचे आवाहन केले. पण, गोयल यांनी असे आवाहन का केले? गुणवत्ता सुधारणे आणि शाश्वत उत्पादन पद्धती स्वीकारणे भारतीय टेक्सटाइल निर्यातदारांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. तसे न केल्यास, लहान आणि मध्यम व्यवसायांना ईयूच्या रीच (रजिस्ट्रेशन, इव्हॅल्युएशन, ऑथोरायझेशन अँड रिस्ट्रिक्शन ऑफ केमिकल्स) आणि इकोडिझाइन फॉर सस्टेनेबल प्रॉडक्ट्स रेग्युलेशन यांसारख्या नियमांचे पालन करणे आव्हानात्मक ठरू शकते. भारतातून वस्त्रोद्योग आणि कच्च्या मालाची निर्यात करणाऱ्या व्यवसायांना येत्या काळात आवश्यक असलेल्या पाच प्रमुख शाश्वतता अटींचा आढावा घेऊया. पहिली अट आहे रासायनिक वापरावरील मर्यादा. कापड उत्पादनामध्ये वापरली जाणारी काही रसायने त्वचेसाठी अत्यंत घातक ठरू शकतात. उदाहरणार्थ, काही कापडांच्या रंगांमध्ये शिसे, क्रोमियम आणि कोबाल्ट यांसारखे धातू असतात, ज्यांमुळे त्वचेवर जळजळ आणि ॲलर्जीक प्रतिक्रिया होऊ शकतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, अशी वस्त्रे कर्करोगाचा धोका वाढवतात. म्हणूनच, ईयूने प्रतिबंधित रसायनांची एक यादी तयार केली आहे. तसेच, कापड निर्मितीमध्ये काही रसायने निर्धारित मर्यादेतच वापरणे बंधनकारक आहे, ज्यासाठी युरोपची स्वतंत्र नियमावली आहे. या याद्या रीच नियमांचा भाग आहेत. युरोपीय देशात माल विकताना नियमांनुसार, उत्पादकांना कापड बनवताना वापरलेले घटक, रंग, फिनिश आणि इतर साहित्यांमधील रसायनांची यादी मालासोबत देणे आवश्यक आहे. इतकेच नव्हे तर, कच्चा माल आणि उत्पादन सामग्री कोणत्या कंपन्यांकडून घेतली आहे, याचे सर्व पुरावे देखील द्यावे लागतात. या सर्व कागदपत्रांची आणि माहितीची उलट तपासणी केली जाते. या प्रक्रियेमुळे युरोपमध्ये आयात केलेले कपडे विषारी रसायनांपासून मुक्त असल्याची खात्री पटते. याउलट, भारतीय बाजारपेठेत कपडे खरेदी करताना ते बनवण्यासाठी कोणत्या रसायनांचा वापर झाला आहे, याचा फारसा विचार केला जात नाही.

# नंदिनी महोत्सव ग्रामीण महिलांचा आत्मसन्मान

## खा. गोवाल पाडवी यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन; ८० बचतगटांच्या वस्तू उपलब्ध

प्रतिनिधी । नंदुरबार

**नंदुरबारमध्ये भरविण्यात आलेले मिनीसरस जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन नंदिनी महोत्सव हा केवळ बचतगटांचा मेळावा नसून ग्रामीण महिलांच्या आत्मसन्मान व कौशल्याचे प्रतीक आहे, असे प्रतिपादन खासदार गोवाल पाडवी यांनी केले.**



नंदुरबार शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिर लगतच्या डोममध्ये कालपासून नंदिनी महोत्सव- २०२६ ला प्रारंभ झाला. खा. गोवाल पाडवी यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. हा महोत्सव २५ फेब्रुवारी ते १ मार्च या कालावधीत पाच दिवस सुरू राहणार आहे. यामध्ये ८० बचत गटांच्या महिलांनी उत्पादित वस्तूंचे स्टॉल तसेच २० खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारण्यात आले आहेत. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, बांधकाम अभियंता शैलेश शिंदे, आरोग्य अधिकारी डॉ. रविंद्र सोनवणे, महिला व बालकल्याण अधिकारी हरिभाऊ हाके, जलजीवन मिशन प्रकल्प संचालक ईश्वर पवार, गटविकास अधिकारी संजय पाटील (नंदुरबार), महेश पोद्दार (शहादा) यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

उमेद मॉलद्वारे बचत गटांना नवीन ओळख केंद्र व राज्य शासन उमेद मॉलच्या माध्यमातून बचत गटांना नवीन ओळख देण्याचा प्रयत्न करीत असून जिल्हानिहाय सुमारे २० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात येणार असल्याची माहिती खा. गोवाल पाडवी यांनी दिली. उमेद मॉलसाठी योग्य शासकीय जागेवर सुसज्ज व्यवस्था उभी करण्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावे. केंद्र शासनाकडून बचतगटांना अधिक मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे खा.पाडवी यांनी सांगितले. ग्रामीण भागातील महिला कुटुंबाची अटम आर जबाबदारी सांभाळत बचत गट चळवळीच्या माध्यमातून आदिवासी बहुल व दुर्गम नंदुरबार जिल्ह्याचे सकारात्मक चित्र राज्यात उभे करत असून जिल्ह्याचा नावलौकिक वाढवत असल्याचेही त्यांनी नमूद केले. उमेद अभियानाची जिल्ह्यात व्यापक पोहोच नंदुरबार जिल्ह्यात उमेद अभियान आज चळवळ बनले असून पावणे तीन लाख कुटुंबांपैकी १ लाख ९० हजार कुटुंबांपर्यंत ही चळवळ पोहोचली आहे. जिल्ह्यात १९ हजार ७०८ बचतगट कार्यरत असून ८० टक्के कुटुंबांपर्यंत पोहोचण्यात यश आले आहे. गावांमध्ये ८६३ ग्रामसंघ व ५५ प्रभाग तयार करण्यात आले आहेत. बचत गटांना सुमारे ५०० कोटी रुपयांपर्यंत बँक लिंकेज देण्यात आले असून कर्ज परतफेडीचे प्रमाण ९७ टक्के आहे. सुनंदा पाडवी यांच्या मोहाच्या लाडूंना पुणे येथील कंपनीकडून चार लाख रुपयांची ऑर्डर मिळाली आहे. खाकरा, मिरची, यांसारख्या उत्पादनांना ऑनलाईन माध्यमातून मागणी वाढत असून अनेक बचत गट दर्जेदार व भेसळमुक्त घरगुती उत्पादने तयार करत नवीन ओळख निर्माण करत आहेत. जिल्हा प्रशासनाने सर्व स्टेकहोल्डर्सना एकत्र आणून बचत गटांच्या गरजांनुसार नियोजन केल्यामुळे सकारात्मक परिणाम मिळत असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी सांगितले. जि.प. सीईओ नमन गोयल यांनी स्टॉल उभारलेल्या महिलांचे यावेळी कौतुक केले.

### ➤ १ लाख १० हजार महिलांना लखपतीदीदी बनविण्याचे उद्दिष्ट

**१ लाख १० हजार महिलांना लखपती दीदी बनविण्याचे उद्दिष्ट असून त्यापैकी १ लाखांचे लक्ष्य गाठले असल्याचे त्यांनी सांगितले. मागील वर्षी सरस महोत्सवात २५ लाख रुपयांची उलाढाल झाली होती. यंदा ५० लाख रुपयांच्या उलाढालीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्जेदार उत्पादने व खाद्यपदार्थांचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी महिला बचतगटांना बँकतर्फे मंजुर अर्थसहाय्याचे धनादेश, आदेशाचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.**

## पटेल महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याची ए.आय. इंजिनिअर पदावर निवड

प्रतिनिधी । शिरपूर



आर.सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित, आर.सी.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील बी. सी. ए. विभागाचा विद्यार्थी वासुदेव संभाजी पाटील याची नामांकित एक्सएल सर्व्हिस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, पुणे या कंपनीत ए.आय. इंजिनीअर पदावर निवड झाली असून, त्याला वार्षिक १०.१६ लाखांचे पॅकेज मिळाले. ही महाविद्यालयासाठी अभिमानास्पद बाब ठरली आहे. या निवड प्रक्रियेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे हर्षल बडगुजर यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी तांत्रिक मुलाखती आणि चाचण्यांची तयारी केली होती. या यशाबद्दल माजी शिक्षणमंत्री आ.अमरिशभाई पटेल, आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट अध्यक्ष भुपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, सचिव राजगोपाल भंडारी, प्राचार्य डॉ. हितेंद्र महाजन, डॉ.ए.एम. पाटील, डॉ.आर.डी.जाधव, सर्व प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.

## संत सावता माळी शैक्षणिक संस्थेच्या प्राथमिक शाळेत विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण

प्रतिनिधी । अडावद,ता.चोपडा

**संत सावता माळी शैक्षणिक व सामाजिक संस्था संचलित खाजगी आदर्श पूर्व प्राथमिक शाळेत गेल्या महिन्यात क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.**




विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांना दाद मिळावी शारीरिक आणि बौद्धिक विकास या साठी सर्व शिक्षक वृंद यांनी स्पर्धेचे आयोजन केले होते .यात बुक बॅलन्स स्पर्धा, संगीत खुर्ची ,गाढवाला शेपूट लावणे ,खो खो, रनिंग अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत सर्व विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहात सहभाग घेतला दि. २७ रोजी बक्षीस वितरण करण्यात आले.बक्षीस वितरण हे सुद्दा तितके महत्वाचे असते कारण छोटंसं बक्षीस विद्यार्थ्यांच्या मनाला नवीन प्रेरणा देते आपल्यातील विविध कलागुण अजून जागृत होण्यास प्रोत्साहन मिळते हा या मागील उद्देश आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक डी. बी. महाजन हे होते.

याप्रसंगी आर. जे. महाजन, एस. टी. महाजन, वाय. एल. साळुंखे, डी. आर. वाघ, कामिनी चौधरी हे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन मेघना महाजन यांनी तर आभार प्रदर्शन पुनम सुतार यांनी मानले.

## दप्तराच्या ओझ्यासोबत मनाचा ताणही होणार हलका; विरवाडे विद्यालयात आत्मजागृती ध्यान कक्ष सुरू

प्रतिनिधी । चोपडा

**विद्यार्थ्यांमध्ये वाढता मानसिक ताण कमी व्हावा आणि त्यांची एकाग्रता वृद्धिंगत व्हावी, या उदात्त हेतूने विद्या भारती माध्यमिक विद्यालय, विरवाडे (ता. चोपडा) येथे आत्मजागृती ध्यान कक्ष या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील एका माध्यमिक विद्यालयाने राबवलेल्या या आदर्श उपक्रमाचे शैक्षणिक क्षेत्रात सर्वत्र कौतुक होत आहे.**



या ध्यान केंद्राचे उद्घाटन विद्याभारती बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष पंडित कोळी व सचिव दीपक सिसोदिया यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी शाळेच्या या नाविन्यपूर्ण प्रयत्नांचे कौतुक करत विद्यार्थ्यांना ध्यानाचे महत्त्व पटवून दिले. मुख्याध्यापक एस.एल.पाटील, योग शिक्षक डी.एस.पाटील यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनेतून या कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ पुस्तकी शिक्षण पुरेसे नसून, त्यांना मानसिक शांतता मिळणेही तितकेच आवश्यक आहे. या विचारातून हा कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना दररोज सकाळी शाळा सुरू होण्यापूर्वी, तसेच ऑफ तासाला ध्यान करण्याची मुभा दिली आहे.

## पान १ वरुन

**राज्यातील बाजार समित्या......**

प्रकार निदर्शनास आले असून या समित्या शेतकऱ्यांसाठी लुटीचे केंद्र बनत चालल्याचा आरोप पवार यांनी केला. अडत्यांकडून आर्थिक फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांनी तक्रार केली, तर त्यांच्याच विरुद्ध खोट्या तक्रारीनुसार गुन्हे दाखल केले आहेत, असे नमूद करून पवार यांनी बाजार समित्यांमधील मागील १०-१५ वर्षांतल्या सर्वच कारभाराचे विशेष समितीमार्फत लेखापरिक्षण करण्याची मागणी केली. बाजार समित्यांच्या आवारात व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांचा शेतीमाल किमान आधारभूत किंमतीपेक्षा कमी दराने खरेदी करू नये, असे बंधन आहे; परंतु राज्यात हे बंधन पायदळी तुडवले जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

**बांगलादेशमध्ये ५.५ रिश्टर......**

सिस्मोलॉजिकल सेंटरनुसार भूकंपाची खोली ३५ किमी होती. कोलकातामधील रहिवासी ओमकार त्रिवेदी यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना सांगितले की, भूकंपाचे धक्के काही सेकंद जाणवले. भूकंपाची तीव्रता इतकी होती की, माझी पार्किंगमध्ये असलेली गाडी जोरात हलत होती. या भूकंपाच्या धक्क्यामुळे रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. अनेक जण इमारतींमधून बाहेर पडून रस्त्यावर जमले.

**विश्व मराठी संमेलनानिमित्त......**

उपमहापौर विलास शिंदे, मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ किरण कुलकर्णी,सहसचिव डॉ. नामदेव भोसले,मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, मराठी भाषा विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे, जिल्ह्यातील कवी, साहित्यिक यांच्यासह नीलम शिर्के आदी सहभागी झाले होते. त्यांच्या हस्ते ग्रंथ आणि पालखीचे पूजन करण्यात आले. तसेच मराठी भाषा गौरव दिवस अर्थात कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. भव्य-दिव्य अशी विठ्ठलाची मूर्ती, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा मुकुट, बोहाडा पथकातील विविध रूपे नागरिकांचे आकर्षण ठरली होती. शोभा यात्रेच्या सुरुवातीस ढोल पथक त्यानंतर आदिवासी नृत्य पथक होते. या शिवाय परराज्यातील नृत्य पथक सहभागी झाले. या शोभायात्रेत विविध शाळा, महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**शेअर बाजारात......**

भू-राजकीय तणाव आणि परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांच्या (एफआयआय) मोठ्या प्रमाणावरील विक्रीमुळे बाजारावर दिवसभर दबाव राहिला. संपूर्ण आठवड्याचा विचार केला तर सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्ही निर्देशांकांमध्ये सुमारे दीड टक्क्यांची घसरण नोंदवली गेली. बीएसई बाजार भांडवल घटले -बीएसईवर नोंदणीकृत कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल (मार्केट कॅप) गुरुवारच्या ४६८.४९ लाख कोटी रुपयांवरून घटून शुक्रवारी ४६३.५१ लाख कोटी रुपयांवर आले.

**तिसऱ्या तिमाहीत भारताचा......**

काही वर्षांत झालेले बदल प्रतिबिंबित करण्यासाठी आधारभूत वर्ष वेळोवेळी अद्ययावत केले जाते. राष्ट्रीय लेखांकनाचे आधारभूत वर्ष २०११-१२ वरून बदलून २०२२-२३ असे सुधारित करण्यात आले आहे. गेल्या काही वर्षांत अर्थव्यवस्थेत झालेल्या बदलांना प्रतिबिंबित करण्यासाठी आधारभूत वर्ष वेळोवेळी अद्ययावत केले जाते. आता नवीन आधार वर्ष २०११-१२ वरून २०२२-२३ असे सुधारण्यात आले आहे. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय दर पाच वर्षांनी विदा मालिकेत सुधारणा करत असले तरी, कोरोना महामारी आणि जीएसटीच्या अंमलबजावणीमुळे ते आधी करता आले नाही.

**राज्यातील १५ लाख......**

नसल्याचा आरोप वाहतूक दारांनी केला आहे. केंद्र सरकारने जानेवारी २०२६ मध्ये सुधारणा करून ४५ दिवसापर्यंत दंड न भरल्यास वाहनाचे कामकाज थांबवून वाहन जप्त करण्याची तरतूद केली आहे. त्यात जनतेला न्यायालयात प्रकरण चालविण्याचा हक्क पूर्णपणे काढून घेतला आहे. इ-चलन यंत्रणा जनतेवर व वाहनधारकांवर जबरदस्तीने लादून खोटे गुन्हे दाखल करून जबरदस्तीने दंड वसूल करण्यात येत असल्याचे महाराष्ट्र ट्रान्सपोर्टर्स ॲक्शन कमिटीचे म्हणणे आहे. राज्यातील सर्वच मालवाहतूक दार या संपात सहभागी होणार आहेत. राज्यातील सुमारे १५ लाख वाहने चक्का जाम मध्ये सहभागी होतील.

**केजरीवाल, सिसोदिया......**

प्रतिमेला डागाळण्याचा प्रयत्न केला, त्याचा परिणाम निवडणुकीत दिसून आला. आप पक्षाला सत्ता गमवावी लागली. तथापि शुक्रवारी आपच्या २३ नेत्यांची उत्पादन शुल्क धोरण प्रकरणात निर्दोष मुक्तता करण्यात आली. यामुळे आपला मोठा दिलासा मिळाल्याचे बोलले जात आहे. पक्षाचा भ्रष्टाचार विरोधी चेहरा काळवंडत चालला की काय? अशी भीती आता ओसरण्याची चिन्हे दिसत आहेत. दिल्लीत आपचे सरकार असताना नायब राज्यपाल आणि सरकारमध्ये वारंवार खटके उडालेले पाहायला मिळाले.

## उत्तरप्रदेशातून आलेला मूकबधिर कामगार बेपत्ता

प्रतिनिधी । चोपडा



तालुक्यातील बुधगाव येथे ॲड.दिनेश वाघ यांच्याकडे गुऱ्हाळावर कामासाठी उत्तरप्रदेशातून १३जण आले होते. पण होळी व धुलीवंदनानिमित्त हे कामगार आपल्या गावी जातात. दि. २५रोजी स्वतः मालकांनी गाडी करून अमळनेर रेल्वेस्टेशनपर्यंत कामगारांना सोडले. पण अचानक भोला नामक व्यक्ती तिथून कुठं गायब झाला हे कळले नाही. सदर व्यक्ती ही मूकबधिर व त्याला लिहिता वाचता येत नाही. बोलू शकत नाही म्हणून त्याच्या अडचणी वाढल्या असतील,असा कयास आहे. पोलिसात तक्रार अद्यापपर्यंत दाखल नाही.तो माझियागाव जि. बदायु (उत्तरप्रदेश )येथील रहिवासी आहे. साथीदारांनी त्याचा शोध घेणे सुरू ठेवला आहे.

## केवळ पुस्तकी ज्ञान नको, कोर्टातील प्रत्यक्ष डावपेच शिका : ॲड. पवार

प्रतिनिधी । धुळे

**कायद्याचा अभ्यास करताना केवळ पुस्तकी ज्ञान नको तर कोर्टातील प्रत्यक्ष डावपेच शिका, असा सल्ला ॲड. कुंदन पवार यांनी दिला. येथील एस. एम. बियाणी विधी महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी दिवाणी खटल्यातील महत्त्वाचे टप्पे 'वाद कथन ते समन्स बजावणी' या विषयावर ते बोलत होते.**



प्रात्यक्षिक आणि पुस्तकी ज्ञान यांची सांगड घालत त्यांनी केलेल्या या सखोल मार्गदर्शनाला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला. पुढे बोलतांना ॲड. पवार यांनी दिवाणी दाव्यातील अनेक महत्त्वाच्या कायदेशीर मुद्यांवर प्रकाश टाकला. कोणताही दावा दाखल करताना प्रथमदर्शनी पुरावा, न्यायाचा समतोल आणि न भरून निघणारे नुकसान या तीन बाबी न्यायालयाच्या निदर्शनास आणून देणे वादीसाठी अत्यंत गरजेचे असते, असे त्यांनी स्पष्ट केले. मालमत्तेच्या वादात दाव्यामध्ये संपत्तीच्या चतुःसीमा अचूक नमूद करणे कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक आहे. तसेच, दाव्यादरम्यान एखाद्या पक्षकाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसांची रेकॉर्डवर नोंद घेणे अनिवार्य असल्याचे त्यांनी सांगितले. विषयाच्या चौकटीबाहेर जाऊन केवळ समन्स बजावणीपर्यंतच न थांबता, प्रत्यक्ष निकाल आणि त्याच्या अंतिम अंमलबजावणीपर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेचे प्रॅक्टिकल ज्ञान विद्यार्थ्यांना दिले. यशस्वी वकिलीसाठी केवळ दिवाणी प्रक्रिया संहितेचे नव्हे, तर कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट, पर्सनल लॉ आणि जनरल क्लॉजेस ॲक्ट यांचेही परिपूर्ण ज्ञान असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सुचवले. पुस्तकी ज्ञानापलीकडे जाऊन न्यायालयातील प्रत्यक्ष कामकाजाचे बारकावे समजून घेण्याची संधी मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात मोठी भर पडली.

# रमजानमुळे टरबुजाचा गोडवा महागला

प्रतिनिधी । दोंडाईचा

**उन्हाळ्याच्या झळा वाढू लागताच सर्वसामान्यांची पावले थंड फळांकडे वळू लागली आहेत. मात्र, यंदा बाजारपेठेत टरबूजाच्या दराने उच्चांक गाठला असून, धुळ्यात टरबूज चक्क ४० रुपये प्रति किलो या विक्रमी दराने विकले जात आहे. रमजान महिना आणि स्थानिक उत्पादनाची कमतरता यामुळे ही दरवाढ झाल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.**



सध्या पवित्र रमजान महिना सुरू असल्याने मुस्लिम बांधवांकडून इफ्तारसाठी फळांना, विशेषतः टरबूजाला मोठी मागणी असते. मात्र, धुळे जिल्ह्यातील स्थानिक शेतकऱ्यांचा माल अद्याप पूर्णपणे तयार होऊन बाजारात आलेला नाही. मागणीच्या तुलनेत आवक अत्यंत कमी असल्याने दरात मोठी वाढ झाली आहे. गेल्या काही वर्षांतील टरबूजाचा हा सर्वाधिक दर असल्याचे बोलले जात आहे. यावलवरून आवक धुळ्याच्या बाजारपेठेत सध्या स्थानिक मालाची प्रतिक्षा असली, तरी ग्राहकांची गरज भागवण्यासाठी व्यापारी परजिल्ह्यातून माल मागवत आहेत. धुळ्यातील व्यापाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या विक्रीसाठी उपलब्ध असलेला हा माल जळगाव जिल्ह्यातील यावल येथून आणला जात आहे. वाहतूक खर्च आणि वाढलेली मागणी यामुळे किरकोळ बाजारात हा दर ४० रुपयांपर्यंत पोहोचला आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी (मोबा.– ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## थोडक्यात

### सोलर बसवण्याच्या वादातून विद्युत कॉलनीत हाणामारी

जळगाव । शहरातील विद्युत कॉलनी भागात सोलर बसवण्याचे साहित्य कोणाचे आहे, अशी साधी विचारणा केल्याचा राग आल्याने एका तरुणावर लोखंडी पाईपने हल्ला करण्यात आला. याप्रकरणी एकाच कुटुंबातील तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी लोकेश जगन्नाथ माळी (वय २८, रा. साई रचना अपार्टमेंट, विद्युत कॉलनी, जळगाव) हे २३ फेब्रुवारी रोजी दुपारी ४:१५ वाजेच्या सुमारास आपल्या घरी होते. यावेळी अपार्टमेंटमध्ये सोलर बसवण्याचे साहित्य पडलेले होते. लोकेश यांनी हे साहित्य कोणाचे आहे, अशी विचारणा केली. यावरुन हाणामारी झाली.

### महात्मा गांधी पुस्तकालयात मराठी भाषा दिन साजरा

**जळगाव** । महात्मा गांधी पुस्तकालयात दि. २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्त मराठी भाषेतील पुस्तकांचे प्रदर्शन भरवण्यात आले व प्रा.एन.व्ही.भारंबे यांनी मराठी विषयाचे महत्त्व किती आहे. मातृभाषा किती महत्त्वाची आहे. याविषयी आपले विचार आपल्या मनोगतात व्यक्त केले. त्यात वाचनालयाचे कार्यकारिणी सदस्य राकेश मुंडले यांनी शाळेतील मुलांना वाचनालातर्फे लहान मुलांची पुस्तके वाचनासाठी देण्यात यावी, यासंदर्भात आपले विचार व्यक्त केले. याप्रसंगी वाचनालयाचे सहसचिव अरविंद जोशी, ग्रंथपाल रमाकांत जोशी व कर्मचारी बिपीन पाटील व इतर वाचक उपस्थित होते.

### संत शिरोमणी सावता महाराज मंदिराचा वर्धापन दिन साजरा

**नशिराबाद** । नशिराबाद येथे श्री विठ्ठल-रुख्मिणी, संत शिरोमणी सावता महाराज मंदिर तसेच श्री गणेश, महादेव शिवलिंग व नंदी मूर्ती प्राणप्रतिष्ठेच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त मसंगीत श्रीमद् भागवत महापुराण ज्ञानयज्ञफ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सात दिवसीय धार्मिक सोहळा दि. २५ फेब्रुवारी ते दि. ४ मार्च दरम्यान होणार आहे. या ज्ञानयज्ञादरम्यान दररोज पहाटे ५.३० ते ६.३० काकड आरती, सकाळी ७ वाजता विष्णुसहस्रनाम, सायंकाळी ४.३० ते ५.३० हरिपाठ आणि रात्री ७.३० ते ११ या वेळेत भव्य श्रीमद् भागवत महापुराण कथामृताचा कार्यक्रम होणार आहे. भागवत कथेचे निरूपण ह.भ.प. सुनील शास्त्री महाराज (नशिराबादकर) यांच्या समधुर वाणीतून होणार असून भाविकांना अध्यात्मिक ज्ञानाचा लाभ मिळणार आहे.

# जैन इरिगेशन कंपनीच्या धनादेश अनादर प्रकरणात

## कर्नाटकातील दोघांना १.०८ कोटी भरपाई देण्याचे आदेश

प्रतिनिधी । जळगाव

**जैन इरिगेशन सिस्टीम्स लिमिटेडच्या धनादेश अनादर (चेक बाऊन्स) प्रकरणात जळगाव येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने महत्त्वाचा निकाल दिला आहे. कर्नाटक येथील राजेंद्र ट्रेड लिंक आणि तिचे दोन भागीदार मिथुन सुरेश जैन व प्रशांत प्रकाश जैन यांना न्यायालयाने दोषी ठरवले आहे. आरोपींना सहा महिने साधा कारावासाची शिक्षा दिली आहे. तसेच जैन इरिगेशन कंपनीला एकूण १ कोटी ८ लाख २० हजार ५८८ रुपये भरपाई देण्याचे आदेशही दिले आहेत. विद्यमान कायद्यातील तरतुदीनुसार धनादेश अनादर प्रकरणात न्यायालयाकडून जलदगतीने कठोर कारवाई केली जात आहे, हे या निकालावरुन दिसून आले.**

> **कायद्याचा दणका**
> धनादेश अनादर हे नेगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट, १८८१ मधील कलम १३८ नुसार फौजदारी स्वरूपाचा गुन्हा आहे. यामध्ये धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट दंड आणि २ वर्षांपर्यंतच्या शिक्षेची तरतूद आहे. या निकालामुळे कायदेशीर व्यवहारात पारदर्शकता ठेवणे किती आवश्यक आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

कर्नाटक राज्यातील हावेरी जिल्ह्यातील रनेबेन्नुर येथील राजेंद्र ट्रेड लिंक या भागीदारी संस्थेने जैन इरिगेशन कंपनीकडून घेतलेल्या मालाच्या देय रकमेपोटी ५४ लाख १० हजार २९४ रुपयांचा धनादेश दिला होता. हा धनादेश बँकेत सादर केला असता तो अनादरीत झाला. यानंतर कंपनीने कायदेशीर नोटीस पाठवूनही आरोपींनी रक्कम अदा केली नाही. अखेर याप्रकरणी न्यायालयात खटला दाखल करण्यात आला. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि उपलब्ध पुरावे ग्राह्य धरून निकाल दिला. न्यायालयाने दिलेल्या निकालात १ कोटी ८ लाख २० हजार ५८८ रुपये जैन इरिगेशनला देण्याचे आदेश दिले आहे. तसेच आरोपींना ६ महिने साधा कारावास शिक्षा सुनावली आहे. कायदेशीर कारवाईचा खर्च म्हणून जैन इरिगेशन कंपनीला अतिरिक्त १५ हजार रुपये देण्याचे आदेशही निकालात दिले आहे. जैन इरिगेशन कंपनीच्यावतीने ॲड. निशांत सुशील अत्रे यांनी प्रभावीपणे न्यायालयात युक्तीवाद करून कंपनी बाजू मांडली.

# विविध कृषी पुरस्कारांसाठी ऑनलाईन संगणक प्रणाली सुरू

## शेतकऱ्यांना अर्ज करण्याचे आवाहन

प्रतिनिधी । जळगाव

**महाराष्ट्र राज्य हे कृषी उत्पादन व कृषी उद्योग क्षेत्रात देशातील अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यातील शेती व पूरक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला, व्यक्ती व संस्थांचा सन्मान दरवर्षी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत विविध पुरस्कारांनी करण्यात येतो. हे पुरस्कार राज्यपाल, महाराष्ट्र यांच्या हस्ते प्रदान करण्यात येतात.**

या पुरस्कारांमध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार यांचा समावेश आहे. यापूर्वी विविध कृषी पुरस्कारांचे प्रस्ताव चार प्रतींमध्ये ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येत होते. प्रस्ताव तयार करण्यासाठी येणारा खर्च, वेळ व प्रक्रियेतील विलंब यामुळे सर्व इच्छुक शेतकरी अर्ज करू शकत नव्हते. या पार्श्वभूमीवर पुरस्कार प्रक्रिया अधिक सुलभ, वेळबद्ध, पारदर्शक व प्रभावी करण्याच्या दृष्टीने कृषी विभागामार्फत स्वतंत्र ऑनलाईन संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

या प्रणाली कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर https://krishi.maharashtra.gov.in येथे कृषी पुरस्कार या टॅबमध्ये उपलब्ध आहे. या संगणकीय प्रणालीद्वारे पुरस्कार प्रस्ताव सादरीकरण, तपासणी, मूल्यांकन तसेच अहवाल निर्मिती ही संपूर्ण प्रक्रिया डिजिटल स्वरूपात राबविणे शक्य होणार आहे. त्यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन पारदर्शकता वाढणार असून कार्यक्षमता व विश्वासार्हता अधिक बळकट होणार आहे. ऑनलाईन प्रणालीमुळे शेतकऱ्यांना घरबसल्या अर्ज सादर करता येणार आहेत. ऑफलाईन चार प्रतींमधील प्रस्ताव तयार करण्यासाठी लागणारा वेळ व खर्च वाचून प्रस्ताव सादरीकरण जलद गतीने होणार आहे. एकदाच अपलोड केलेली कागदपत्रे पुन्हा-पुन्हा देण्याची आवश्यकता नाही. अर्ज कुठल्या टप्प्यावर आहे याची माहिती शेतकऱ्यांना सहज मिळणार आहे. छपाई, प्रवास व खर्च कमी होणार आहे.

# खान्देश महोत्सव सापडला वादाच्या भोवऱ्यात

## 'जय जय महाराष्ट्र माझा'चा मनपाला पडला विसर

प्रतिनिधी । जळगाव




**खान्देशची संस्कृती, कला आणि खाद्यपरंपरेचा वारसा जगासमोर मांडण्यासाठी जळगाव महानगरपालिकेतर्फे सागर पार्क येथे खान्देश महोत्सव उत्साहात सुरू झाला. मात्र, पहिल्याच दिवशी कार्यक्रमात राज्यगीताचा समावेश न झाल्याने व प्रोटोकॉलचे पालन न केल्याने प्रशासनावर टीकेची झोड उठली आहे. या प्रकारामुळे जळगावकरांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या कार्यक्रमात वंदे मातरम् सादर करण्यात आले. मात्र, महाराष्ट्राचे राज्यगीत जय जय महाराष्ट्र माझा वाजवण्यात आले नाही. याबाबत महापौर दीपमाला काळे यांनी तातडीने दिलगिरी व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.**

दुसरीकडे, मनपा आयुक्तांनी हा कार्यक्रम शासकीय नसून सांस्कृतिक स्वरूपाचा असल्याने राज्यगीताची अनिवार्यता नव्हती, अशी भूमिका घेतल्याने वाद अधिकच चिघळला आहे. महाराष्ट्राच्या भूमीत होणाऱ्या सांस्कृतिक सोहळ्यात राज्यगीताचा सन्मान व्हायलाच हवा, अशी भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. कार्यक्रमादरम्यान नगरसेवकांच्या नावांचा ज्येष्ठतेनुसार प्रोटोकॉल पाळला गेला नसल्याची तक्रारही पुढे आली आहे. काही महिला नगरसेवकांच्या नावांतही चुका झाल्याचे समोर आले. लोकप्रतिनिधींच्या सन्मानाबाबत झालेल्या या दुर्लक्षामुळे मनपा प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. महापौरांच्या हस्तक्षेपानंतर पुढील दिवसांमध्ये या महोत्सवाचे आयोजन अधिक शिस्तबद्ध पद्धतीने होईल का? याकडे लक्ष लागले आहे.

# मातोश्री विद्यालयात मराठी भाषा गौरव सप्ताहाची उत्साहात सुरुवात

प्रतिनिधी । जळगाव

**प्रबोधन संस्था संचालित मातोश्री प्राथमिक विद्यालय, जळगाव येथे दि. २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा गौरव सप्ताह संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार जयप्रकाश बाविस्कर यांच्या प्रमुख मार्गदर्शनात मोठ्या उत्साहात व अभिमानाने साजरा करण्यात आला.**



सप्ताहाची सुरुवात ज्येष्ठ साहित्यिक कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच दीपप्रज्वलनाने झाली. जळगाव जिल्हा नियोजन अधिकारी भरत साळुंखे, माजी शिक्षणाधिकारी शशिकांत हिंगोणेकर, जैन इरिगेशनच्या प्रसिद्धी विभागाचे किशोर कुळकर्णी, प्रबोधन संस्थेचे प्रशासकीय अधिकारी ॲड. कैलास सोनार, शाळेचे मुख्याध्यापक समाधान इंगळे, समाधान ठाकरे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. मराठी दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांनी आपल्या भाषण व कविता सादरीकरणातून सांगितले. त्यात रोहित विश्वनाथ देवराज (इ. २ री), कल्पेश देवराज, प्रियंका विनोद साळुंखे (इ.३ री), प्रांजल समाधान सोनवणे (इ. ४ थी), आरती पवार, हेमांगी सोनवणे (इ. ५ वी), सना तडवी, समर शिरसाळे, प्रियांशी पवार (इ. ६ वी), मयूर ठाकरे, ज्ञानेश्वरी देवराज (इ. ७ वी), तेजश्री बाविस्कर, अक्षरा कुंभार, आदिती वानखेडे, अनूजा कोळी, स्वप्निल पाटील, पियुष कढरे, सोहम शिरसाळे, कृष्णा राठोड, रोहित बाविस्कर, रोहित तायडे यांनी मनोगतात मराठी भाषा ही आपल्या संस्कृतीची ओळख असून तिचे जतन व संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन केले. भरत साळुंखे विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा अभिमान बाळगून दैनंदिन जीवनात तिचा जास्तीत जास्त वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले. या सोबतच त्यांनी वि.वा. शिरवाडकर यांची कणा ही कविता विद्यार्थ्यांसमोर म्हणून दाखविली. ज्येष्ठ साहित्यिक शशिकांत हिंगोणेकर यांनी कुसुमाग्रज आणि त्यांच्या जीवनकार्याबाबत सांगून स्वरचित पेढे गाव ही कविता विनोदी शैलीने विद्यार्थ्यांना म्हणून दाखविली. तात्यासाहेब वि.वा. शिरवाडकर यांच्याकडून आपल्याला सुंदर हस्ताक्षराबाबत प्रेरणा मिळाली असे पत्रकार किशोर कुलकर्णी यांनी सांगून कुसुमाग्रजांच्या झालेल्या भेटींबाबत त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. सूत्रसंचालन कविता गावित यांनी तर आभार कैलास सोनार यांनी मानले.

# पोलीस दलात अंतर्गत खांदेपालट

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी प्रशासकीय सोयीच्या दृष्टीकोनातून आणि कायदा व सुव्यवस्था तसेच सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन, जिल्हा पोलीस दलातील आठ पोलीस अंमलदारांच्या अंतर्गत बदल्या केल्या आहेत. या सर्व अंमलदारांची नेमणूक जळगाव येथील सायबर पोलीस स्टेशन येथे करण्यात आली आहे. दि. २५ फेब्रुवारी जिल्हा पोलीस आस्थापना मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.**

प्रशासकीय बाबी, कायदा व सुव्यवस्था आणि सायबर पोलीस स्टेशनचे कामकाज विचारात घेऊन, आस्थापना मंडळाला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून या नेमणुका करण्यात आल्या आहेत.

यामध्ये एक पोलीस हेड कॉन्स्टेबल, दोन महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल, एक महिला पोलीस नाईक आणि चार पोलीस कॉन्स्टेबल नाईक यांचा समावेश आहे.

बदली झालेल्या पोलीस अंमलदारांची त्यांच्या सध्याच्या नेमणुकीच्या ठिकाणाहून सायबर पोलीस स्टेशन येथे बदली करण्यात आली आहे. त्यात पोहेकॉ राजेंद्र गुरमल राठोड, शवाशा जळगाव, पोहेकॉ निता सुभाषसिंग राजपूत स्थागुशा जळगाव, पोना सारीका रविंद्र वाणी यावल पोस्टे, पोकॉ निखिल मुकुंदा नारखेडे पो. मु. जळगाव, पोकॉ विनोद दुर्गालाल चौधरी यावल पोस्टे, पोना कल्पेश मुरलीधर आमोदकर रावेर पोस्टे, पोकॉ मुकेश पांडुरंग लोकरे पिंपळगाव हरे, पोकॉ भूषण अशोक माळी वरणगाव पोस्टे यांचा समावेश आहे.

# नेहल वाणी हिच्या हूनर चित्र प्रदर्शनास प्रारंभ

प्रतिनिधी । जळगाव

**येथील नेहल वाणी हिने रेखाटलेल्या चित्रांच्या हूनर या प्रदर्शनाचा रिंग रोडवरील पु. ना. गाडगीळ अँड सन्सच्या कला दालनात प्रारंभ झाला.**



यावेळी महाराष्ट्र राज्य पणन महासंघाचे उपाध्यक्ष रोहित निकम, गोदावरी फाउंडेशनच्या डॉ. केतकी पाटील, नंदिनीबाई महाविद्यालयाच्या प्राचार्य चारुलता पाटील, पु.ना. गाडगीळ जळगाव शाखेचे व्यवस्थापक गिरीश डेरे व कला शिक्षक आणि मार्गदर्शक तरुण भाटे यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन योगेश राका यांनी तर प्रास्ताविक कृष्णकुमार वाणी यांनी केले. आभार माधुरी वाणी यांनी मानले. या कार्यक्रमास रोटरी क्लब जळगाव वेस्टचे सदस्य, मित्र परिवार आणि समाज बांधवासह मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

प्रदर्शन दि.२८ फेब्रुवारी रोजी बुधवार सोडून दररोज सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत सर्व नागरिकांना पाहण्यासाठी खुले आहे. उपस्थितीचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# रोटरी जळगाव ग्रीन सिटीतर्फे रविवारी शांतता सायकल रॅली

प्रतिनिधी । जळगाव

**येथील रोटरी क्लब ऑफ जळगाव ग्रीनसिटीतर्फे दि.२२ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेसात वाजता शांतता सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.**

रिंगरोडवरील धुलिया सायकल मार्ट येथून रॅलीचा शुभारंभ होणार आहे. नूतन मराठा महाविद्यालय, शिवतीर्थ, बस स्थानकमार्गे स्वातंत्र्य चौक, जिल्हाधिकारी कार्यालय रोड येथून आकाशवाणी चौक, भाऊंचे उद्यान असा रॅलीचा मार्ग राहणार आहे. मायादेवी मंदिरासमोरील धर्मदाय आयुक्त कार्यालयाच्या मैदानावर रॅलीचा समारोप करण्यात येणार आहे. रॅलीमध्ये सर्वांना विनामूल्य खुला प्रवेश असून सहभागी सायकल स्वरांना सहभाग प्रमाणपत्र, टी-शर्ट, रूट सपोर्ट आणि रॅलीनंतर नाश्त्याची सुविधा उपलब्ध करण्यात आल्याचे आयोजकांनी कळविले आहे. जळगावकर नागरिकांनी या शांतता सायकल रॅलीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे रोटरी ग्रीनसिटीच्या अध्यक्ष धनश्री ठाकरे, मानद सचिव ॲड. अभय कुलकर्णी व प्रकल्प प्रमुख इरफान पिंजारी यांनी आवाहन केले आहे.

# नगरसेवकांच्या सहीने सुधारणार जळगावकरांचे आरोग्य

## महापौरांच्या निर्देशानुसार नगरसेवक डायरी उपक्रमाचा प्रत्यक्ष प्रारंभ सुरू

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील स्वच्छता आणि आरोग्य सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी महापौर दीपमाला काळे यांनी दिलेल्या सूचनेनुसार, आता शहरात नगरसेवक डायरी उपक्रम गेल्या दोन दिवसांपासून अधिकृतपणे सुरू झाला आहे. या उपक्रमामुळे प्रभागातील कामांमध्ये पारदर्शकता येऊन तक्रारींचे निवारण जलद गतीने होईल, असा विश्वास महापौरांनी व्यक्त केला आहे.**



**असा आहे नगरसेवक डायरी उपक्रम?**

आरोग्य विभागाच्या काही दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीत महापौरांनी प्रशासनाला या डायरीबाबत कडक निर्देश दिले होते. या उपक्रमाचे स्वरूप, प्रत्येक प्रभागातील आरोग्य निरीक्षकांकडे ही डायरी सोपवण्यात आली आहे. संबंधित आरोग्य निरीक्षकाने आपल्या प्रभागातील कामाची माहिती नगरसेवकांना देऊन त्यावर त्यांची स्वाक्षरी घेणे बंधनकारक आहे. डायरीमध्ये केवळ सहीच नाही, तर कामाच्या दर्जाबाबत नगरसेवकांचे अभिप्राय आणि सूचना नोंदवल्या जातील.

यामुळे आरोग्य विभागाने दिवसभरात नेमके काय काम केले, याचा थेट अहवाल लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून प्रशासनासमोर येणार आहे. अनेकदा प्रभागात काम होत नसल्याच्या तक्रारी नगरसेवकांकडून केल्या जातात, तर दुसरीकडे प्रशासनाकडून काम पूर्ण झाल्याचा दावा केला जातो. हा पेच सोडवण्यासाठी नगरसेवक डायरी एक महत्त्वाचा दुवा ठरणार आहे.

या नवीन उपक्रमामुळे शहरातील कचरा संकलन, गटारींची स्वच्छता आणि औषध फवारणी यांसारख्या मूलभूत सुविधांच्या नियोजनात मोठी सुधारणा होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.



> आरोग्य निरीक्षकांनी नगरसेवकांच्या संपर्कात राहून स्वच्छतेची कामे करून घेणे अपेक्षित आहे. या डायरीमुळे कामात पारदर्शकता येईल आणि कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर देखरेख ठेवणे सोपे होईल.
> **- दीपमाला काळे, महापौर, मनपा जळगाव**

# रोटरी क्लब जळगावचा नो फॉरवर्ड विथआऊट थिंकिंग जनजागृती उपक्रम

प्रतिनिधी । जळगाव

**डिजिटल माध्यमांच्या वाढत्या वापरामुळे चुकीची, अप्रमाणित किंवा भडकावू माहिती वेगाने प्रसारित होत आहे. अशा संदेशांमुळे समाजात गैरसमज, तणाव आणि मतभेद निर्माण होण्याची शक्यता वाढते. याची गंभीर दखल घेत रोटरी क्लब जळगावतर्फे (विचार न करता फॉरवर्ड करू नका) हा जनजागृती उपक्रम हाती घेण्यात आला आहे.**

फेब्रुवारी महिन्यातील निमित्त या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेद्वारे नागरिकांना कोणताही संदेश पुढे पाठवण्यापूर्वी थांबून विचार करणे, त्याची सत्यता पडताळणे आणि तो समाजहिताचा आहे का? हे तपासण्याचे आवाहन करण्यात येत आहे. चुकीची माहिती, अफवा किंवा द्वेषपूर्ण संदेश समाजात तणाव निर्माण करू शकतात. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने जबाबदार डिजिटल वर्तन स्वीकारणे ही काळाची गरज आहे. थांबा विचार करा मगच फॉरवर्ड करा, हा या मोहिमेचा मुख्य संदेश आहे. या उपक्रमांतर्गत विविध जनजागृती पोस्टर्स, सोशल मीडियावरील संदेश आणि प्रबोधनात्मक साहित्य प्रसारित करण्यात येत आहे. नागरिकांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून जबाबदार डिजिटल नागरिक म्हणून समाजात सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन प्रकल्प प्रमुख संदीप शर्मा, मानद सचिव सुभाष अमळनेरकर व अध्यक्ष गिरीश कुलकर्णी यांनी केले आहे.

# अमळनेर नगरपरिषदेचा करवाढ नसलेला ३८३.८३ कोटींचा अर्थसंकल्प मंजूर

## अर्थसंकल्प सर्वांगीण विकासाचा रोडमॅप ठरणार : नगराध्यक्ष





प्रतिनिधी । अमळनेर

**येथील नगरपरिषदेच्या सन २०२६–२७ या आर्थिक वर्षासाठीच्या ३८३.८३ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पास विशेष सभेत सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा पार पडली. सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात कोणत्याही प्रकारची करवाढ न करता विकासकामांना प्राधान्य देण्यात आले आहे. हा अर्थसंकल्प अमळनेरच्या सर्वांगीण विकासाचा रोडमॅप ठरणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. पायाभूत सुविधांवर विशेष भर देत शहरातील रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण, पाणीपुरवठा यंत्रणेचे आधुनिकीकरण, स्वच्छता व्यवस्थेची सुधारणा तसेच सार्वजनिक आरोग्य केंद्रांचे उन्नतीकरण यासाठी तरतूद करण्यात आली आहे.**



**➤ मंजूर अर्थसंकल्प अंतिम मान्यतेसाठी जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव यांच्याकडे सादर करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. या निर्णयामुळे अमळनेर शहरातील विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.**

महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य सुविधा वाढविण्यावरही विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. शहरातील वाढत्या सुरक्षेच्या गरजा लक्षात घेऊन सीसीटीव्ही यंत्रणा उभारणी, पथदिव्यांची सुधारणा आणि इतर सुरक्षाविषयक उपाययोजना हाती घेण्यात येणार आहेत.

तसेच कर वसुली सुधारणा आणि विविध शासकीय योजनांमधून निधी उपलब्ध करून विकासकामांना चालना देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. हा अर्थसंकल्प केवळ आकड्यांचा ताळेबंद नसून अमळनेरच्या उज्ज्वल भविष्यासाठीची दिशा असल्याचे सभेत सांगण्यात आले. नागरिकांना मूलभूत सोयी–सुविधा अधिक सक्षम व दर्जेदार स्वरूपात उपलब्ध करून देणे आणि शहराचा सर्वांगीण विकास साधणे हा या अर्थसंकल्पाचा मुख्य उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले. सविस्तर चर्चेनंतर सभागृहाने अर्थसंकल्पास सर्वानुमते मंजुरी दिली असून त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.

# महाराजस्व अभियानाचा नागरिकांनी लाभ घ्यावा : तहसीलदार सूर्यवंशी

प्रतिनिधी । धरणगाव

**शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व महसूल समाधान शिबीर अभियान (टप्पा–१) संदर्भात नागरिकांना अधिकाधिक माहिती मिळावी, या उपक्रमाचा व्यापक लाभ व्हावा, यासाठी धरणगाव तहसील कार्यालयाच्या सभागृहात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती.**

यावेळी तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी यांनी अभियानाची सविस्तर माहिती देताना सांगितले की, महसूल विभागाशी संबंधित सर्वसामान्य नागरिकांचे दैनंदिन प्रश्न सोडविणे, तक्रारींचे तत्काळ निराकरण करणे, तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान बनविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या शिबिरांतर्गत सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांसाठी रहिवासी दाखला, उत्पन्न दाखला, जातीचा दाखला, रेशन कार्ड आदी महत्त्वाच्या कागदपत्रांचे वितरण करण्यात येणार आहे. तसेच संजय गांधी निराधार योजना, पीएम किसान योजना यांसह विविध सामाजिक लाभ योजनांचा लाभ देण्याची सोय उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय सात–बारा उताऱ्यांचे वाटप, प्रलंबित फेरफार नोंदी निर्गत करणे, तसेच विविध शासकीय योजनांसाठी आवश्यक दाखले व प्रमाणपत्रांबाबत आवश्यक ते कामकाज शिबिराच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याचे सूर्यवंशी यांनी सांगितले. नागरिकांनी या शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. पत्रकारांनी अभियानाची माहिती नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवून जनतेला शिबिराचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन केले. यावेळी नायब तहसीलदार संदीप मोरे, नायब तहसीलदार लक्ष्मणराव सातपुते, नगराध्यक्षा लिला चौधरी यांच्यासह ज्येष्ठ पत्रकार रवींद्र कंखरे, बी. आर. महाजन, राजेंद्र वाघ, ॲड. स्वप्नील भाटिया, विनोद रोकडे, निलेश पवार, भगीरथ माळी, विजय पाटील, पी. डी. पाटील, चंद्रकांत कोठारी, सतीश शिंदे, शैलेश भाटिया, सुबोध खैरनार, योगेश मांडगे, सुशील महाजन आदींची उपस्थिती होती.




## थोडक्यात

### भगीरथ स्कूलमध्ये गुरु तेग बहादूर यांचा जीवनपट

**जळगाव ।** हिंदी चादर या उपक्रमांतर्गत भगीरथ इंग्लिश स्कूलमध्ये व्याख्यानाच्या माध्यमातून शिखांचे नवे गुरु तेग बहादुर यांच्या जन्मापासून ते बलिदानापर्यंतचा प्रेरणादायी इतिहास प्रमुख वक्ते डॉ. व्ही. एस पाटील यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडला. यावेळी औरंगजेबाने जबरदस्तीने धर्मांतर करण्याच्या कार्याला गुरु तेग बहादूर यांनी दिलेला नकार, धर्म रक्षणाकरिता काश्मिरी पंडितांचे गुरुंनी केलेले नेतृत्व, सत्य, धर्मरक्षण, अन्यायाचा प्रतिकार यासाठी दिलेले बलिदान मानव मात्रांसाठी दिलेली समतेची शिकवण यावर प्रकाश टाकला.

# धरणगावच्या प्रभाग ८ व ९ मधील विद्यार्थ्यांसाठी पुस्तके वाटप

प्रतिनिधी । धरणगाव

**धरणगाव नगरपरिषदचे नगरसेवक सुनील चौधरी यांच्या पुढाकारातून प्रभाग क्रमांक ८ व ९ मधील इयत्ता तिसरी ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना विविध नामांकित लेखकांची पुस्तके मोफत वाटप करण्यात आली.**

या उपक्रमामागील प्रमुख उद्देश विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या अतिवापरापासून दूर राहून वाचनाची सवय लावावी, ज्ञानाची कक्षा रुंदावावी आणि सकारात्मक विचारसरणी विकसित व्हावी हा होता. आपल्या भाषणात सुनिल चौधरी यांनी स्पष्ट केले की, मोबाईल क्षणिक आनंद देतो, पण पुस्तक आयुष्यभराचा मार्गदर्शक ठरतो. वाचन संस्कृती जोपासली तरच विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल होईल.



कार्यक्रमास डोंगर चौधरी, जिजाबराव पवार, एकनाथ पाटील, राजेंद्र बोरसे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

मान्यवरांनी या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करून विद्यार्थ्यांना नियमित वाचनाची सवय लावण्याचे आवाहन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी पप्पू भाटिया, बंटी देशमुख व नंदिनी पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

या अनोख्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

धरणगाव शहरात वाचन संस्कृतीला नवे बळ मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. हा स्तुत्य उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# घाटे विद्यालयात स्वच्छता, वृक्षलागवड अभियान

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

उचंदे येथील तापी–पूर्णा विद्या प्रसारक मंडळ संचलित घाटे ए.एस. विद्यालय व जुनियर कॉलेज उचंदे व सामाजिक वनीकरण विभाग व राष्ट्रीय हरित सेनेच्या अंतर्गत राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्ताने 'एक पेड माँ के नाम' व विद्यालय परिसर स्वच्छता अभियानाचा उपक्रम राबवून विद्यालय परिसरात वृक्ष लागवड आणि परिसराचा ओला कचरा आणि सुका कचरा वेगळा करून शालेय परिसर स्वच्छ करण्यात आला. राष्ट्रीय हरित सेना शिक्षक प्रशांतराज तायडे यांनी संत गाडगेबाबा यांच्या जीवनाविषयी विद्यार्थ्यांना माहिती देऊन स्वच्छतेचे मानवी जीवनावर होणारे सकारात्मक परिणाम, त्यांच्या सभोवतालच्या परिसराच्या प्रसन्नतेवर होणारा प्रभाव, याविषयी प्रबोधन करून स्वच्छता हे आपले मूलभूत कर्तव्य समजा असे सांगितले.

# ज्येष्ठ नागरिक संघात स्वातंत्र्य वीर सावरकर पुण्यतिथी साजरी



प्रतिनिधी । चोपडा

**ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहातील पटांगणात स्वातंत्र्य वीर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण डॉ.मिलिंद सरदार, समन्वयक माधव बाग पुणे यांचे हस्ते करण्यात आले.**

ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष जयदेव देशमुख यांनी डॉ. मिलिंद सरदार यांचा शाल, गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तेव्हा संघाचे माजी अध्यक्ष विजय करोडपती , सचिव विलास पाटील, सहसचिव विलास सु. पाटील, कोषाध्यक्ष दिलीपराव पाटील, ज्येष्ठ सदस्य श्यामभाई गुजराथी, रमेश शिंदे, गोकुळ पाटील , प्रा.सुधाकर पाटील, ॲड.व्ही.बी. पाटील, शांताराम पाटील, गिरीराज बारी आदी सभासद बंधू हजर होते.




चोपडा : स्वातंत्र्य सैनिक शामराव गोविंदा पाटील माध्यमिक विद्यालय वर्डी (ता.चोपडा) येथील कलाशिक्षक भूषण सानप यांनी मराठी राजभाषा गौरवदिनानिमित्त ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांचे विद्यालयातील फलकावर खडूने रेखाटलेले हस्तचित्र.

# कुडे विद्यालयाची विद्यार्थिनी देविका महाजनची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी । धरणगाव

**येथील बालकवी ठोंबरे प्राथमिक विद्यालय व सारजाई कुडे विद्यालयामध्ये शिक्षण घेणारी इयत्ता तिसरीतील विद्यार्थिनी कु. देविका गोरख महाजन हिने अल्पवयात क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. रावेर येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत देविकाने गोळाफेक या प्रकारात प्रथम क्रमांक पटकावत सुवर्ण यश मिळवले. तसेच १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तिने तृतीय क्रमांक मिळवून आपली बहुगुणी कामगिरी सिद्ध केली.**





या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर देविकाची पंढरपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. अल्पवयात मिळवलेले हे यश शाळा तसेच धरणगाव परिसरासाठी अभिमानास्पद ठरले आहे. देविकाच्या या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी प्रा. रमेश महाजन, अध्यक्ष हेमलाल भाटिया, उपाध्यक्ष चिंतामण पाटील, सचिव ललित उपासनी तसेच संचालक मंडळाने तिचे अभिनंदन केले.

मुख्याध्यापक जीवन पाटील व एस. एस. पाटील, शिक्षक–शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही शुभेच्छांचा वर्षाव केला. देविकाला शाळेतील क्रीडाशिक्षक एस. एल. सूर्यवंशी यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या यशात पालकांचा मोठा वाटा आहे. वडील गोरख महाजन, आई मनीषा महाजन तसेच भाऊ हृषीकेश पहेलवान व कृष्णा पहेलवान यांनी सतत प्रोत्साहन दिल्यानेच हे यश शक्य झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

# पंकज विद्यालयात चिमुकल्यांच्या सादरीकरणातून मराठी भाषेचा जागर

## ● मराठी भाषा गौरवदिनानिमित्त नृत्य, कविता, गायन आदी कार्यक्रमांचे सादरीकरण

प्रतिनिधी । चोपडा

**पंकज प्राथमिक विद्यालयात मराठी भाषा गौरवदिन अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेश बोरोले यांनी मन:पूर्वक शुभेच्छा देत मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वांना प्रेरित केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अरुण मोरे उपस्थित होते.**

ज्ञान, संस्कार आणि संस्कृतीचा दीप प्रज्वलित करत ज्येष्ठ साहित्यिक कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यांच्या साहित्यकृतींच्या स्मरणाने वातावरण मराठी अभिमानाने भारावून गेले होते. कार्यक्रमाची सुरुवात साने गुरुजी यांच्या मंगलमय प्रार्थनेने झाली. त्यानंतर कुसुमाग्रज यांचा जीवन परिचय,अभंग, भजन, नृत्य , कविता गायन आणि महाराष्ट्र गौरव गीत यांच्या सुमधुर सादरीकरणाने सभागृह दुमदुमून गेले. इयत्ता चौथीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या सादरीकरणातून मराठी संस्कृतीचे रंग उधळले. चित्र रेखाटन उपक्रमात विद्यार्थ्यांनी संतपरंपरा, महाराष्ट्राचा इतिहास आणि मातृभाषेचे महत्त्व यांचे मनोहारी चित्रण साकारले. विद्यार्थ्यांनी विविध महान मराठी व्यक्तिमत्त्वांची वेशभूषा परिधान करून कार्यक्रमात जणू इतिहास सजीव केला.




**सर्वांनी मराठी भाषा जपू, वाढवू आणि तिचा अभिमान बाळगू, असा सामूहिक संकल्प केला. मराठी भाषा गौरव दिनाचा हा सोहळा सूत्रसंचालन दिलीप जैस्वाल यांनी केले. विद्यालयाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदला जाईल असा अविस्मरणीय ठरला.**

त्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वर्गशिक्षक दिलीप जैस्वाल, मनोज अहिरे आणि विजय राठोड यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. शिक्षक वृंद व दिलीप बाविस्कर, कैलास बोरसे, किशोर पाटील, रविंद्र शार्दुल, प्रमोद पाटील या कर्मचाऱ्यांचे सहकार्य कार्यक्रमाच्या प्रत्येक टप्प्यावर लाभले.

# लोकसहभागातून राजोरा जि. प. शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

प्रतिनिधी । यावल

**जि.प. शाळा राजोरे येथे शिवजयंतीच्या पर्वावर शिवमय वातावरणात रंगोत्सव २०२६ अर्थात विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले.**

शाळेला कार्यक्रमातून ४७ हजार ५०० रुपयांची बक्षिसे व शाळेच्या पूर्ण रंगाचा खर्च जगदीश सपकाळे यांनी उचलला. या कार्यक्रमास पालकांसह गावातील सर्व प्रतिष्ठित व गणेश मंडळाच्या सर्व तरुणांनी स्नेहसंमेलनाकरिता मदत करून कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान रितेश सावरकर मॅनेजर सेंट्रल बँक शाखा यावल तसेच जयेश शिंदे लिपिक सेंट्रल बँक यावल यांनी भूषवले. कार्यक्रमात शिवजयंतीचा उत्सव छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे विधिवत प्रतिमा पूजन करून व त्यांच्या आरतीने सुरुवात करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर कुलदीप पाटील यांनी छत्रपतींच्या विचारांवर प्रकाश टाकला, स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करून एकूण २१ कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. शिवछत्रपतींचा पाळणा गीत, मुलगी वाचवा मुलगी शिकवा पथनाट्य, भारूळ, जोगवा, विविध संस्कृतींवर आधारित गाणे यांचा कार्यक्रमात समावेश होता.